आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२० ऑक्टोबर २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- वाराणसीत आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सहा हजार १०० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं लोकार्पण आणि उद्घाटन

- कृषी उत्पादनांचा शेतकऱ्यांना मिळणारा भाव आणि बाजारातल्या किरकोळ विक्री किंमतीतली तफावत कमी करण्यासाठी सरकार समिती स्थापन करणार असल्याची शिवराज सिंग चौहान यांची माहिती

- दिवाळी आणि छटपूजा या सणांसाठी मध्य रेल्वेकडून ५७० विशेष फेऱ्या

- राजस्थानमधल्या धौलपूर इथं राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या अपघातात १२ जणांचा मृत्यू

**आणि**

- भारत विरुद्ध न्यूझीलंडच्या कसोटी क्रिकेट सामन्यात न्यूझीलंडकडून भारताचा आठ गडी राखून पराभव, मालिकेत १-० अशी घेतली आघाडी

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद मोदी आज वाराणसी मतदारसंघाला भेट देणार आहेत. एकंदर सहा हजार एकशे कोटी रुपयांच्या प्रकल्पांचं लोकार्पण आणि उद्घाटन प्रधानमंत्री या दौऱ्यात करणार आहेत. प्रधानमंत्री आज दुपारी दोन वाजता वाराणसीला पोचतील आणि आर. जे. शंकर नेत्र रुग्णालयाचं उद्घाटन करतील. त्यानंतर ते दुपारी साडेचार वाजता वाराणसीतील सिगरा स्टेडियम इथं विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करणार आहेत. वाराणसीच्या

लालबहाद्दूर शास्त्री आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची आणि विस्तारीत धावपट्टीची पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

यासाठी दोन हजार ८७० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आग्रा, दरभंगा आणि बागडोगरा विमानतळांच्या नवीन नागरी केंद्रांची पायाभरणी प्रधानमंत्री दूरस्थ पद्धतीनं करणार आहेत. मध्य प्रदेशातील रेवा विमानतळ , अंबिकापूरचा मा महामाया विमानतळ आणि सारस्वा विमानतळ यांच्या नवीन टर्मिनल इमारतींचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं होणार आहे. खेलो इंडिया योजना आणि स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत २१० कोटी रुपये खर्चून पुनर्विकास करण्यात आलेल्या वाराणसी क्रीडासंकुलाचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

<><><><><>

कृषी उत्पादनं आणि बागायती उत्पादनांचा शेतकऱ्यांना मिळणारा भाव आणि या उत्पादनांची बाजारातली किरकोळ विक्री किंमत यातली तफावत कमी करण्यासाठी सरकार एक समिती स्थापन करणार आहे , अशी माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी दिली. ते आज नवी दिल्लीत एका कृषी परिषदेत बोलत होते. शेतकरी आपलं भाजीपाला ५ रुपये किलो भावानं विकतात आणि किरकोळ बाजारात मात्र तो ५० रुपये किलो भावानं विकला जातो , ही तफावत कमी करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्याचं काम ही समिती करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. कृषी संशोधनाचे फायदे प्रयोगशाळेपासून शेतापर्यंत पोहचवण्यासाठी पुढच्या महिन्यापासून ‘कृषी चौपाल’ उपक्रमाचा प्रारंभ केला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

**आसाम, बिहार, छत्तीसगड, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश , राजस्थान आणि पश्चिम बंगाल** या राज्यांमधील विधानसभेच्या काही जागांसह **केरळमधील** एका लोकसभा मतदारसंघात होणाऱ्या आगामी पोटनिवडणुकांसाठी भारतीय जनता पार्टीनं आपल्या पक्षाच्या उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी भाजपानं काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वड्रा यांच्या विरोधात नव्या हरिदास यांना उमेदवारी दिली आहे.

**<><><><><>**

श्रोते हो , विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नाशिक जिल्ह्यातल्या ८ मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडीतल्या घटक पक्षांमध्ये जागावाटप करण्याआधी आपल्या पक्षाला विचारात घेतलं नाही , असं राष्ट्रीय जनता दलाचे नेते मनोज कुमार झा यांनी म्हटलं आहे. झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेस ७० जागांवर तर राजद आणि मार्क्सवादी लेनिनवादी कम्युनिस्ट पक्ष ११ जागांवर लढणार असल्याचं काल झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते हेमंत सोरेन यांनी जाहीर केलं होतं. त्यावर राजदने नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान , जागावाटप निश्चित करण्याआधी इंडिया आघाडीतल्या सर्व पक्षांशी चर्चा केली होती , असं स्पष्टीकरण काँग्रेस नेते राजेश ठाकुर यांनी दिलं आहे.

**<><><><><>**

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२० ऑक्टोबर २०२४ - रविवार

दिवाळी आणि छटपूजा या सणांसाठी उत्तर आणि पूर्वेकडच्या राज्यांकडे जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेनं ५७० विशेष फेऱ्या जाहीर केल्या आहेत. महाराष्ट्रातील मुंबई , पुणे आणि नागपूरसह विविध ठिकाणांहून या फेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. १३२ फेऱ्या मुंबईहून , तर १४६ फेऱ्या पुण्याहून निघणार आहेत. तर १०८ फेऱ्या लातूर , सावंतवाडी, नागपूर, पुणे, कोल्हापूर, नांदेड आणि इतर ठिकाणी पोचणार आहेत. या रेल्वेंमध्ये वातानुकूलित , शयनयान आणि सर्वसाधारण डब्यांचा समावेश आहे. दक्षिणेकडच्या करीमनगर , कोचुवेली, काझिपेट आणि बेंगळुरूसाठी ८४ फेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. अधिक माहिती आणि सविस्तर वेळापत्रक प्रवासी www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळावरून किंवा NTES ऍपच्या माध्यमातून जाणून घेऊ शकतील.

<><><><><>

राजस्थानमधल्या धौलपूर इथं राष्ट्रीय महामार्गावर काल रात्री झालेल्या रस्ते अपघातात १२ जणांचा मृत्यू झाला. मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये महिला आणि मुलांची संख्या अधिक आहे. लग्नसमारंभाहून परत येत असताना बस आणि रिक्षा एकमेकांवर धडकल्यामुळे हा अपघात झाला. बस चालक आणि वाहक दोघांची स्थिती गंभीर असून त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

<><><><><>

दिल्लीतल्या रोहिणी परिसरात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या शाळेबाहेर आज सकाळी स्फोट झाल्याचं वृत्त आहे. घटनेचं वृत्त कळताच पोलिसांनी घटनास्थळाला भेट दिली. स्फोटात कोणीही जखमी झालेलं नसल्याची माहिती पोलिसांनी दिली असून जवळच्या दुकानाच्या काचेचं आणि दुकानाजवळ उभ्या असलेल्या गाडीच्या काचांचं नुकसान झालं आहे. बॉम्बनाशक पथक ,

न्यायवैद्यकशास्त्र पथक आणि तपास पथक घटनास्थळी दाखल झालं असून तपास सुरू असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

तेलंगणा लोकसेवा आयोगाच्या गट १ सेवेच्या उमेदवारांचं समर्थन करत सुरु असलेल्या विरोध प्रदर्शनात सहभागी झाल्याबद्दल तेलंगणा पोलिसांनी केंद्रीय गृह राज्यमंत्री बंडी संजय कुमार यांना अटक केली. हे उमेदवार भरती प्रक्रिया आणि आरक्षणासंदर्भात सरकारच्या काही आदेशांच्या अंमलबजावणीला विरोध दर्शवत मुख्य परीक्षा स्थगित करण्याची मागणी करत आहेत. संजय कुमार यांनी काल विरोध प्रदर्शन करणाऱ्या परीक्षार्थींची भेट घेतली होती. त्यानंतर मुख्यमंत्री रेवन्त रेड्डी यांना भेटून उमेदवारांची बाजू मांडण्यासाठी कुमार यांनी चलो सचिवालय रॅली काढली. मात्र पोलिसांनी त्यांना सचिवालयात जाण्यापासून रोखलं आणि त्यांना ताब्यात घेऊन नामपल्लीमधल्या भाजपाच्या कार्यालयात सोडलं.

**<><><><><>**

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आजपासून सात दिवसांच्या सिंगापूर आणि ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहेत. सिंगापूरमधल्या दोन दिवसांच्या भेटीत प्रधान भारतीय समुदायाच्या सदस्यांशी संवाद साधणार आहेत. ते उद्या सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वॉंग आणि उप प्रधानमंत्री गान किम यॉंग यांची भेट घेणार आहेत. ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यात धर्मेंद्र प्रधान त्या देशाचे शिक्षणमंत्री जॅसन क्लेअर यांची भेट घेणार आहेत. ऑस्ट्रेलिया आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेच्या उद्घाटन सत्रात ते सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

इंडोनेशियाचे नवे राष्ट्रपती म्हणून प्राबोवो सुबियांतो यांनी पदभार स्वीकारला आहे. इंडोनेशिया जगातली तिसरी मोठी लोकशाही असून  ७३ वर्षांचे प्राबोवो

सुबियांतो इंडोनेशियाचे आठवे राष्ट्रपती बनले आहेत.  विशेष दलांचे माजी कमांडर असलेल्या प्राबोवो सुबियांतो यांना १४ फेब्रुवारीला झालेल्या निवडणुकीत जवळपास ६० टक्के मतं मिळाली.

**<><><><><>**

इस्रायलनं गाझाच्या उत्तर भागातल्या बेत लाहिया परिसरात केलेल्या हल्ल्यात ७० जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. ढिगाऱ्याखाली आणखी काही जण गाडले गेल्याची भीती व्यक्त होत आहे. मदत आणि बचावकार्य सुरू असल्याची माहिती गाझा सरकारच्या माध्यम कार्यालयानं दिली आहे. इस्राईल लष्करानं गाझाच्या उत्तर भागात सुरू केलेल्या मोहिमेमुळे या परिसरात अन्न , पाणी आणि वैद्यकीय सेवांसारख्या अनेक सुविधा खंडित आहेत. इस्राईलच्या सुरक्षा दलांनी मात्र हमासच्या आरोपांबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करत संख्या वाढवून सांगितली जात असल्याचा दावा केला आहे.

**<><><><><>**

भारत विरुद्ध न्यूझीलंडच्या कसोटी क्रिकेट सामन्यात न्यूझीलंडनं भारताचा आठ गडी राखून पराभव करत मालिकेत १-० नं आघाडी घेतली आहे. भारताने दुसरा डाव काल ४६२ धावांवर आटोपल्यानंतर न्यूझीलंडसमोर १०७ धावांचं लक्ष्य ठेवलं होतं. हे लक्ष्य २ गड्यांच्या मोबदल्यात न्यूझीलंडनं पूर्ण केलं आणि भारतावर विजय मिळवला.

**<><><><><>**

हॉकीमध्ये भारताच्या कनिष्ठ पुरुष संघानं जोहोर सुलतान २०२४ विश्वकरंडक स्पर्धेत जपानच्या संघाचा ४-२ असा पराभव केला.

**//<><><><><>//**